# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार सरणी

**प्रा. डॉ. अजय पेत्रस बोरकर** सिध्दार्थ महाविदयालय, चिचपल्लीता. जि. चंद्रपुर (४२२)

**सारांश :.** डॉ. भिमराव रामजी आंबेडकर हे थोर विचारवंत, दलित, शोषित, पिडितांचे कैवारी व मसिहा होते. दलितात स्वतःची जाणीव निर्माण करणारे क्रतिंकारक महापुरूष, समाजसुधारक व थोर शिक्षणतज्ञ होते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होते. जातीभेदाचा त्याग त्यांना अत्यंत त्रास सहन करावा लागाला. त्यातुन त्यांचे व्यक्तीमत्व निर्माण झाले.

आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करून विधिशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र यात प्रभुत्व संपादन केले. दलित, शोषित व पीडित यांच्या सर्वागिण विकासासाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. ते पत्रकार, शिक्षणतज्ञ, दलितोध्दार, प्रज्ञासुर्य, विश्वभुषण होते. त्यांनी लोकशिक्षक या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य करून आपले शिक्षणविषयक विचार मांडले. न्याय, समता, आणी बंधुता, या चार आधारभुत तत्वांचे हे पुरस्कर्ते होते. त्यांनी गौतम बुध्द, संत कबीर आणी महत्मा फुले यांना गुरू मानले होते. विश्वभुषण, भारतरत्न या सर्वश्रेष्ठ पुरस्कराने ते सन्मानित झाले आहेत.

कि वर्ड : विचारवंत, दलित, शोषित, कैवारी, शिक्षण, समता, बंधुता.

**प्रस्तावना:.**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व जगातील सर्वात मोठया मानव मुक्तीलढ्याचे प्रमुख म्हणुण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगभर ओळखल्या आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विविध पैलुनी व्यापलेले आहे. त्यांनी समाजशास्त्र, राज्यशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, विद्याशास्त्र, इतिहास अशा विषयात तसेच शिक्षण, साहित्य, कला क्रीडा हया क्षेत्रातही आपल्या व्यापक चिंतनातून कामगिरी केलेली आहे. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूमधील एक एक पैलू हा पथदार्शक व अनुकरणीय आहे. शिक्षणक्षेत्रात डॉ. बाबासाहेंनी मोलाचे योगदान दिले आहे. ते स्वतः उच्च विदयाविभूषित होते. विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, प्राचार्य आणी शिक्षण संस्थेचे संस्थापक असा शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा जीवनाचा चढता आलेख आहे. राज्यघटनेचे शिल्पकार असलेल्या आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन खूप व्यापक होता. त्यांचे स्वतःचे शिक्षण खुप प्रतिकूल परिस्थितीत झाले आहे. शिक्षणाशिवाय मनुष्याचा विकास होवु शकत नाही असा आदर्शच त्यांनी घालुन घेतला होता.[१]

बाबासाहेब म्हणत शिक्षण हे वघिणीचे दुध आहे ते पिल्यावर व्यक्ती गुरगुरल्याशिवाय राहत नाही. शिक्षणाने व्यक्तीचा सर्वार्गीण विकास होतो. ज्ञाना अभावी मनुष्याचे तत्त्वतः समाजाचे ही नुकसान होते. तसेच एखादी व्यक्ती किंवा समाजाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्या व्यक्ती किंवा समाजाचे अस्तित्व नाकारून त्यांच्या क्षमतांना मारून टाकणे होय अशी त्यांची शिक्षणाविषयक धारणा होती. बाबासाहेबांना शिक्षणाद्रवारे स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मानवी मूल्ये स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करायचा होता. शिक्षणाचे महत्व सांगण्यासाठी त्यांनी शिका. संघटीत व्हा व संघर्ष करा असा महत्वाचा संदेश दिलेला आहे. शिक्षणामुळेच मनुष्य जागृत होतो. त्याला त्यांच्या हक्क आणी अधिकाराबाबत जाणीव करून दिले.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शास्त्र आहे असे ते सांगत त्यांनी प्राथमिक ते उच्चशिक्षण अशा सर्व स्तरातील शिक्षणाला महत्वाचे मानले आहे. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे म्हणूण ते शिक्षण दर्जेदार व गुणवतेचे आसावे. डॉ. बाबासाहेब सांगत की प्राथमिक शिक्षणाचे उदिष्ट असे असावे की एकदा मुलगा किंवा मुलगी प्राथमिक शिक्षणासाठी शाळेत दाखल झाले की पूर्णपणे सुशिक्षित माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडले पाहिजे.[२]

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार :–

### १.शिक्षण हे जिवन जगण्याचे साधन :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवाला शिक्षणाविषयी महत्व सांगताना आपले मत माडले. त्यात असे सांगीतले की शिक्षण अभावी माणव हा प्राणी आहे. तसेच उदाहरण सांगताना ते म्हणतात ज्याप्रमाणे माणसावर उपासमारीची वेळ आल्यास माणूस कुपोषित होतो तो अल्प आयुषी होतो. त्याचप्रमाणे माणवाला शिक्षण न मिळल्यास तो गुलाम बनतो. शिक्षण हे वघिणीचे दुध आहे जो व्यक्ती हे प्राशन करेल तो गुरगुरल्यशिवाय राहणार नाही. शिक्षणाचा माणवाला आपल्या आत्मस्वातंत्र्य व आत्मरक्षणासाठी वापर करता येतो.

### २. व्यक्ति स्वातंत्र्यासाठी शिक्षण आवश्यक : –

व्यक्ती स्वातन्त्र्याची आवश्यकता जर मान्य असेल तर प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी आपले स्वातंत्र्य रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे अत्यंत गरजेचे आहे. ती शक्ती शिक्षणाशिवाय उत्पन्न होवू शकत नाही.

### ३.शिक्षण गुलामगिरी नष्ट करण्याचे साधनः–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाला प्रगतीचे साधण मानतात. शिक्षणाची व्याख्या करताना ते म्हणतात की, 'शिक्षण म्हणजे मानसिक व बौध्दीक विकास घडवून आणणारे सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे व आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे साधण होय' ते सांगतात गुलामाला

त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो याविरूध्द बंड करून उठेल. या क्रांतिकारी विचाराची पेरणी मानवाला मनात करणे केवळ शिक्षणानेच शक्य होते.[३]

**४.संघटीत होण्यासाठी व संघर्षासाठी शिक्षण :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा हा नारा सांगीतला. समाजात नाना प्रकाराच्या असमानता सामान्य मानवाची या मध्ये पिळवणूक होते. धर्म, वर्ण, जात, लिंग इत्यादी क्षेत्रातील असमानता ही माणवाच्या विकासाला कारणीभूत ठरते. म्हणुण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असमानता दुर करण्यासाठी व समाजात स्थापन करण्यासाठी शिक्षणाला महत्व दिले.

**५.समाजातील दुःख नष्ट करण्यासाठी शिक्षण :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षणप्रणालीत प्रज्ञा, शिल आणी करूणा आवश्यक आहे. केवळ शिक्षण असुन चालणार नाही तर शिक्षणाला प्रज्ञेची झालर असली पाहिजे. शिक्षणाचा उपयोग फक्त स्वतःचे पोट भरण्यासाठी केले जावू नये तर व्यक्तीने आपल्या शिक्षणाचा उपयोग दुसऱ्यांच्या डोळयातील अश्रु पुसण्यासाठी व समाजातिल दुःख नष्ट करण्यासाठी करावा.[४]

**६. शोषणातून मुक्तीसाठी शिक्षणाची गरज :-**

शोषून मुक्तीसाठी शिक्षण हा सर्वोतम उपाय असल्याचे डॉ. बाबासाहेब सांगितले. सामान्य माणसाला जिवन जगताना वरीष्ठ जाती व धर्माकडून फसविले जावु शकते किंवा अल्पशिक्षीत असल्यास त्यावर कोणीही सामाजीक, आर्थिक, व राजकीय अत्याचार करू शकतो परंतु शिक्षणामुळे असे होणार नाही. त्यावर कोणत्याही प्रकाराचे शोषण केले जावू शकत नाही.

**७. शिक्षणामुळे परिवर्तन :-**

शिक्षणामुळे परिवर्तन होते हे डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे सुत्र आहे. समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन या जगात नाही. कारण शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे यावर डॉ. आंबेडकर यांची गाढ श्रध्दा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्याचे शैक्षणिक क्रांतिची आवश्यकता असल्याची जाणिव ही डॉ. आंबेडकर यांना आहे. 'व्यक्तीला जाणिव करून देते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या करीत डॉ. आंबेडकर गुलामाला त्याच्या गुलामीची गुपित सांगतांना म्हणतात की, 'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणुस हीनवल होवून अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध राहील्यास जिवंतवपीच दुसऱ्याचा गुलाम होतो. 'शिक्षणाच्या अभावीने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते म्हणून स्वाभिमानाने, स्वावलंबानाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्व आहे.[५]

**८. उच्च शिक्षणाचे महत्व :-**

उच्च शिक्षणाने मानवी आयुष्यात अत्यंत महत्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वानुभवाने उच्च शिक्षणाचे किती महत्व आहे हे मिलींद महाविद्ययाच्या उध्दाटन प्रंसगी केलेल्या भाषनातुन सांगतात, मी हिंदु समाजाच्या अगदी खालच्या थरातुन आल्यामूळे शिक्षणाचे किती महत्व आहे हे जानतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे सांगितले जाते, पण ही चुक आहे. हिंदूस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पुर्विप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्यांची मुले प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागते तो न्युनगंड त्यांच्यातून नाहीसा करणे, चालु समाज पध्दतीमुळे जे त्यांचे जिवन निर्दयीपणे लुबाडण्यात आले आहे, त्याचे त्यांच्या स्वतःच्या दुष्टीने काय महत्व आहे, याची त्यांना जाणीव करून देने हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज कशानेच हे साध्य होणार नाही.

**९. स्त्री शिक्षणाविषयी विचार : -**

डॉ. आंबेडकर स्त्री शिक्षणाच्या संदर्भात म्हणतात, मुलाला शिक्षण दिल्याने एकच व्यक्ती शिक्षित होतो. मुलीला शिक्षण दिल्याने संपूर्ण कुंटूब शिक्षीत होते. भारतीय संविधानाच्या कलम १६(अ) नुसार स्त्री पूरूष भेद सामाजीक व्यवस्था अनैसर्गिक मानुन स्त्रीयांना बरोबरीचा दर्जा देवून सामाजिक न्यायाची भूमिका बजावली आहे. स्त्री पुरूषांचे सामुहिक सहजीवन आंबेडकरांना मान्य होते. मूला मुलींच्या सहशिक्षणाची कार्यप्रनाली विरोध होतामहाड येथील २६ डिसेंबर १९२७ च्या परिषदेत आपल्या भाषणात बाबासाहेब स्त्रीयाना उध्देशुन म्हणाले, आपल्या मुलाना शिक्षण द्या , पूढील १९४२ च्या अखिल भारतीय दलित महीला परिषदेत त्यांनी प्रातिक सरकारला तरतुदी करण्याचा आग्रह धरला होता.

१) स्त्री शिक्षणात मागे आहे पुरूषांच्या मानाने मागासलेल्या आहेत. त्यासाठी त्यांना प्रत्येक ठिकाणी ५० मुलींचे वसतिगृह सरकारी खर्चाने काढावे.

२ दुय्यम व उच्च दर्जाचे शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या अस्पृष्य समाजातील मुलींना सर्व सरकारी व निमसरकारी शाळामधुन स्कॉलरशिप देण्याची तरतुद करावी

महीलांना सामाजीक हक्क मिळावेत यासाठी हिंदू कोड बिलाचाही त्यांनी पाठपुरावा केला.

**१०. स्वातन्त्र्य, समता आणि बंधुताची शिकवण :-**

फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला देलेली अभुतपूर्व देनगी म्हणजे स्वातन्त्र्य, समता आणि बंधुता. ज्या ठिकाणी स्वातंत्र्य नसेल तेथे गुलामगिरी किवा पारतंत्र्य येते. व्यक्तीच्या सर्वागीण विकासासाठी केलेली अधिकारांची मागणी म्हणजे स्वातंत्र्य होय. धर्म, जात, वर्ण, लिंग इत्यादी कारणामुळे विषमता असते तेथे समानता नाहीशी होउन समाजात भेदभाव निर्माण होतो. असा भेदभाव राष्ट्राला घातक असल्यामूळे डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी संविधानात समान दर्जा व समान संधिची तरतूद करून समता प्रस्थापित करण्याचे प्रयन्त केले आहे. स्वातन्त्र्य,

**११. शिक्षणातून नैतिकता व लोकशाही जीवनमूल्यांचे संवर्धन करणे गरजेचे :-**

नैतिकता, शिक्षण व लोकशाही या विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. 'लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर जनता किवा समाज नैतिक मूल्यधिष्ठीत शिक्षणाव्दारे संस्कारित असावा लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षित नैतिक मूल्यधिष्ठित समाजाची लोकशाही ही सर्वाधिक यशस्वी किंवा हमखास ठरू शकेल.

**१२. राजकीय क्रांतिचा पाया :-**

राजकीय सत्ता ही प्रगतीच्या सर्व दरवाज्यांची किल्ली होय असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. महात्मा फुलेंच्या पावलावर पाउल ठेवून अस्पृष्यांना जागविण्यात त्यांचे हक्क व अधिकार प्राप्त करून देण्या करीता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपुर्ण जिवन वाहीले. त्यांनी आपल्या मुकनायक, वहिस्कृत भारत, प्रबुध्द भारत या वृत्तपत्रातून, पाक्षिकांतुन प्राथमिक शिक्षण व उच्च शिक्षण अस्पृष्यांना अन्नासारखे अतिशय आवश्यक असुन ह्याकडे त्यांचे आकर्षन वाढविण्याकरीता त्यांना शैक्षणिक सवलती दिल्या पाहीजे. त्यांना इतरांच्या बरोबरीने आणन्यासाठी आर्थीक मदत सरकारकडून मिळने अत्यावश्यक आहे. त्याशिवाय त्यांच्या वर्षानुवर्षाचा अंधार मिटणार नाही.[६]

**१३. राजकीय समाजसुधारणेचे मुळ :-**

सर्व समाज सुधारकांनी शिक्षणाला समाजसुधारनेचे मुळे मानले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संघटीत होवून संघटन शक्ती मजबुत करून संघर्षाकडे जाण्यासाठी लोकांना त्यांनी सर्वप्रथम शिका हा मोलाचा संदेश दिला. शिक्षणाशिवाय आपली शक्ती जागृत होणार नाही आपण स्वतःला ओळखले पाहीजे. आपण कोणत्या पातळीवर आहोत याची जाणीव असली पाहीजे. त्याशिवाय आपल्यातील माणुस जागा होणार नाही. या सर्व बाबींकरीता एकच मार्ग तो म्हणजे शिक्षण असे बाबासाहेब म्हणतात.

**१४. समानतेसाठी शिक्षण :-**

समाजात दिवसेंनूदिवस असमानता दिसत असल्याबद्दल डॉ. बाबासाहेंब आंबेडकरांना खंत वाटत होती त्यांच्या मतानुसार ''शिक्षण प्रत्येकाच्या आवाक्यात आणता आले पाहिजे. म्हणून निम्नस्तरीय वर्गासाठी शिक्षण जेवढे स्वस्त व सुलभ करता येईल तेवढे करता आले पाहिजे.'' समानतेचा अर्थ म्हणजे खालच्या वर्गाची पातळी वरच्या वर्गाच्या पातळीपर्यंत आणणे होय. म्हणून खालच्या लोकांना शिक्षण घेण्यासाठी विशेष सवलती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

**१५. दलित शिक्षण संस्थेची स्थापना :-**

शोशीत वंचीत समाजासाठी माध्यमिक शिक्षणाची सोय करण्याच्या ध्येयाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित शिक्षण संस्थेची स्थापना १४ जून १६२८ रोजी केली. दलित विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बाबासाहेबांनी मुंबई सरकारला ह्या संस्थेस मदत करण्याचे आवाहन केले. मुंबई गव्हर्नरनेही या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पाच वसतीगृहे मंजूर केली व दरमहा नऊ हजार रूपयांचे अनुदानही वसतिगृहासाठी मंजूर केले. शिक्षणामुळे कनिष्ठ जातीची स्थिती सुधारेल म्हणून त्यांनी अनेक शैक्षणिक कार्य केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संविधानात केलेल्या शैक्षणिक तरतूदी –**

२८,१ नुसार राज्याच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणीक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही विवक्षित शैक्षणीक संस्थान धार्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य आहे.

२९,१ राज्याकडुन चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतुन सहाय मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणीक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारल्या जाणार नाही.

३०,१ धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गाना आपल्या पसंतीच्या शैक्षणीक संस्था स्थापण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

३०,२ शैक्षणीक संस्थांना सहाय देताना राज्य, एखादी शैक्षणीक संस्थाही, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखादया वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे. या कारणावरून तिला प्रतिकूल होईल, अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

२१ क राज्य हे सहा वर्षापासून ते चौदा वर्षापर्यतच्या मुलांना कायदयाने ठरविल्याप्रमाणे शिक्षण देईल.

४१– राज्य हे आपली आर्थिक समता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा शिक्षणााचा हक्क आणी बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडीत अशा व्यक्तींच्या बाबतीत आणी काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाटयाला आले आहे. अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसहायाचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.

४५– राज्य हे बालाकंचे वय सहा वर्षाचे होईपर्यत, त्यांचे संगोपण करण्यासाठी आणी त्यांच्या शिक्षणासाठी तरतूद करील.

४६– राज्य, जनतेतील दुर्बल घटक आणी विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणीक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील, आणी सामाजिक अन्याय व सर्व प्रकाराचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करील.

५१– जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने आपल्या अपत्यास अथवा पाल्यास त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदाव्या शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

**निष्कर्ष :–**

डॉ. आंबेडकरांना अपेक्षित असलेली शैक्षणिक क्रांतीची लाट या देशात अजुन आलीच नाही. ती यावी असे वाटत असल तर अजुन वेळ गेलेली नाही. गरज आहे ती शैक्षणिक धोरण राबविणाऱ्या शासनाच्या मनोवृत्तीची बदल होण्याची. आजच्या युगात ज्ञान ही विकासाची गुरूकिल्ली असताना एखाद्या समुहाला त्यापासुन वंचित करणे म्हणजे एक प्रकारे त्यावर नव्या प्रकारची गुलामगिरी लादणे हो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांमुळे दलित, पिडीत, आदिवासी समुदायात कमालिचे परिवर्तन दिसुन येत आहे. त्याचबरोबर संपुर्ण भारतीय समाजव्यवस्थेत परिवर्तन घडून येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणविपयक विचारांच्या विश्लेषणावरून त्यांच्या मानविय जिवनाच्या सफल व प्रतिष्ठापूर्न जीवन जगण्यासाठी हा अविभाज्य घटक असल्याचा दृष्टिकोण स्पष्ट होतो.

**संदर्भः–**

१. गायकवाड ज्ञानराज काशीनाथ (ऑगस्ट २०१६) महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर कोल्हापूर, रिया पब्लिकेशन

२. घोडेस्वार प्रविण संपादक (२०१६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन प्रश्नः नाशिक यंशवतराव चव्हान महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३. डॉ. जावळे वि. जी. बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डोळस प्रकाशन – बिड आवृती –२००३.

४. डॉ. फाडके भालचंद्र – फुले आंबेडकर शोध आणी बोध, आनंद प्रकाशन औरंगाबाद आवृती –११८५.

५. शंकरराव खरात – दलिताचे शिक्षण, इंद्रायाणी साहीत्य प्रकाशन – पूणे – २०१०.

६. शेषराव मोरे– डॉ आंबेडकर सामाजिक धोरण एक अभ्यास राजहंस प्रकाशन पूणे.